राष्ट्रीय जैव विविधता प्राधिकरण
National Biodiversity Authority, India
2003

# जैव-विविधता वारसा स्थळांचा शोध, अधिसूचना व व्यवस्थापनासाठीच्या मार्गदर्शक सूचना

राष्ट्रीय जैव-विविधता प्राधिकरण, भारत

# जैव-विविधता वारसा स्थळांचा शोध, अधिसूचना व व्यवस्थापनासाठीच्या मार्गदर्शक सूचना



राष्ट्रीय जैव-विविधता प्राधिकरण

भारत

‘जैव-विविधता वारसा स्थळांचा शोध, अधिसूचना व व्यवस्थापनासाठीच्या मार्गदर्शक सूचना’ ही पुस्तिका जैविक विविधता अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने संस्थात्मक रचनेचे सबलीकरण करण्याच्या भारत सं.रा.वि.का. च्या जैव-विविधता प्रकल्पांतर्गत सं.रा.वि.का.च्या सहाय्याने छापली आहे.

रा.जै.प्रा.च्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या मार्गदर्शक सूचनांची ही प्रत, व्यापक वितरणाकरिता संपादित करून छापली आहे.

**अधिक माहितीकरिताः**


राष्ट्रीय जैव-विविधता प्राधिकरण
५ वा मजला, टी.आय.सी.ई.एल. पार्क,
सी.एस.आय. मार्ग, तारामणी,
चेन्नई- ६०० ११३ तामिळनाडू, भारत.
ravishankar.thupalli@undp.org
projectmanager@nbaindia.in
www.nbaindia.org

# प्रस्तावना

जैविक विविधता अधिनियम, २००२ च्या अनुभाग ३७ प्रमाणे जैव-विविधतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या क्षेत्रांना जैव-विविधता वारसा स्थळे (जै.वा.स्थ.) म्हणून मान्यता देण्याऱ्या अधिसूचनेची गरज असते. हे लक्षात घेऊन प्रारंभी श्री. आर.पी.एस. किटवाई व नंतर श्री. आर.के. सुब्रमणियम यांच्या अध्यक्षतेखालील समितीद्वारे 'जैव-विविधता वारसा स्थळांचा शोध व व्यवस्थापनासाठीच्या मार्गदर्शक सूचना विकसित करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय जैव-विविधता प्राधिकरणाने हा उपक्रम हातात घेतला आहे.

या मार्गदर्शक सूचना विकसित केल्याबद्दल मी उपरोल्लेखित समितीचे अध्यक्ष व सदस्यांचे आभार व्यक्त करतो. सध्या या मार्गदर्शक सूचना राष्ट्रीय जैव-विविधता प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या मार्गदर्शक सूचनांचा पर्याप्त उपयोग करूनच राज्य जैव-विविधता मंडळे जैव-विविधता वारसा स्थळांची निश्चिती करतात.

उपरोल्लेखित मार्गदर्शक सूचनांवर आधारून 'जैव-विविधता वारसा स्थळांचा शोध, अधिसूचना व व्यवस्थापनासाठीच्या मार्गदर्शक सूचना' ही पुस्तिका जैविक विविधता अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने संस्थात्मक रचनेचे सबलीकरण करण्यासाठीच्या भारत सं.रा.वि.का. जैव-विविधता प्रकल्पांतर्गत छापली आहे. ही महत्त्वपूर्ण पुस्तिका प्रकाशित करण्याकरिता मी सं.रा.वि.का.च्या ह्या प्रकल्पाचे आभार व्यक्त करतो.

डॉ. बाळकृष्ण पिशुपती
अध्यक्ष
राष्ट्रीय जैव-विविधता प्राधिकरण
चेन्नई

# जैव-विविधता वारसा स्थळांचा शोध, अधिसूचना व व्यवस्थापनासाठीच्या मार्गदर्शक सूचना

## १. प्रस्तावना

**१.१** जैव-विविधतेचा पारिस्थितिकीय सुरक्षेकडे व पर्यायाने मानवी कल्याणाकडे फार जवळचा संबंध असतो. ऱ्हास होत जाणारी जैविक संसाधने व त्यांच्या गैरवापराची भीती या चिंतांमुळेच १९९२ साली जगभरातील सर्व देशांनी जैविक विविधता परिषद (जै.वि.प.) स्थापित केली. ह्या परिषदेने पहिल्यांदाच जैविक संसाधनांवरील त्या-त्या राष्ट्रांच्या सार्वभौम हक्कांचा स्वीकार केला व केवळ पर्यावरण-अनुकूल उद्देशांसाठीच जनुकीय संसाधनांनी प्रवेश दिला गेला पाहिजे व तो राष्ट्रीय कायद्याच्या अधीनतेने दिला पाहिजे, यावर भर दिला. भारत देशही एक महा-जैव-विविधता लाभलेला व जै.वि.प.चा सदस्य असलेला देश आहे. जै.वि.प.च्या तरतुदींची दखल घेऊन तसेच देशातील जैविक संसाधनांचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने, भारत सरकारने जैविक विविधता अधिनियम, २००२ विधीसंमत केला. जैविक विविधता नियम २००४ साली अधिसूचित केले गेले.

**१.२** जैविक विविधता अधिनियमात, जैविक विविधतेचे संवर्धन, तिच्या घटकांचा चिरकालीन वापर तसेच जैविक संसाधने आणि संलग्न ज्ञान यांच्या वापरामुळे निर्माण झालेल्या लाभांची न्याय्य व समभाग वाटणी यांची व त्यांच्या आव्हानांना सामोरे जाण्याची तरतूद आहे. राष्ट्रीय जैव-विविधता प्राधिकरण, राज्य जैव-विविधता मंडळे (रा.जै.मं.) तसेच जैव-विविधता व्यवस्थापन समित्या (जै.व्य.स.) ह्या राष्ट्रीय, राज्य व स्थानिक स्तरावरील कार्यकारी संस्थांद्वारे विकेंद्रीत पद्धतीने जै.वि. अधिनियमांची अंमलबजावणी सध्या चालू आहे.

**१.३** जै.वि. अधिनियमात, अधिवासांतर्गत तसेच बाह्य अशा दोन्ही परिस्थितींमध्ये संवर्धनाची तरतूद आहे. अधिनियमानुसार 'बाह्य संवर्धन' म्हणजे जैव-विविधतेच्या घटकांचे त्यांच्या नैसर्गिक अधिवासाबाहेर केलेले संवर्धन, तसेच त्यांच्या नैसर्गिक पर्यावरणात विशिष्ट जातींची आणि पाळीव व लागवडीत जातींच्या बाबतीत, जिथे त्यांनी विशिष्ट गुणधर्मांचे विकसन केले आहे, त्या अधिवासात त्यांची देखरेख व पुनर्प्राप्ती.

## २. जैव-विविधता वारसा स्थळांचे महत्त्व व उद्देश

**२.१** पारंपारिक देखरेखीखालील क्षेत्रांतील जैव-विविधतेच्या संवर्धनाकरिता तसेच बहुव्यापी व्यवस्थेच्या क्षेत्रांतील जैव-विविधतेची वेगाने होणारी हानी अडविण्याकरिता, ह्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांचा शोध घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय ही क्षेत्रे म्हणजे निसर्ग,

संस्कृती व समाज तसेच तंत्रज्ञान यांच्यामधील एक प्रातिनिधीक सकारात्मक दुवा असल्यामुळे, संवर्धन तसेच उपजीविकेची खात्री होते व रानटी तसेच पाळीव जैव-विविधतेमधील सकारात्मक दुवे बळकट होतात.

**२.२** आपल्या सभोवताली तसेच परिवेशात एखादे जै.वा.स्थ. असणे ही त्या समाजाच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे आणि समाजाच्या या कृतीमुळे तेथील भविष्यकालीन पिढ्यांना उपजिविकेची खात्री होण्याबरोबरीनेच संपूर्ण देशासाठी तो एक आदर्श बनू शकतो. सर्वसाधारणपणे आज देवराई मानल्या गेलेल्या आणि विशेषतः देशाच्या पूर्व, उत्तरपूर्व व पश्चिम घाट परिसरातील क्षेत्रे/स्थळांना जै.वा.स्थ. म्हणून घोषित व अधिसूचित करता येईल.

**२.३** अनुभाग ३७ च्या उप-अनुभाग (२) प्रमाणे राज्य सरकारने केंद्र सरकारकडे चर्चा करून जै.वा.स्थ.चे व्यवस्थापन व संवर्धनाकरिता नियम करता येतील.

**२.४** जै.वि. अधिनियम, २००२ च्या अनुभाग ३७ प्रमाणे, स्थानिक स्वराज्य संस्थांकडे मसलत करून राज्य सरकारने जैव-विविधतेच्या दृष्टीने महत्त्वाची क्षेत्रे, जैव-विविधता वारसा स्थळे (जै.वा.स्थ.) म्हणून राजपत्रात अधिसूचित करता येतील.

**२.५** अनुभाग ३७च्या उप-अनुभाग (३) प्रमाणे, तशा प्रकारच्या अधिसूचनेमुळे आर्थिकदृष्ट्या बाधित झालेल्या समाजगटांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने योजना बनवता येतील.

**२.६** जै.वि. अधिनियमाच्या उपरोल्लेखित अनुभागाप्रमाणे, २.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे तातडीने उपक्रम हाती घेण्याची गरज आहे. तसेच समाजाच्या सगळ्याच घटकांमध्ये संवर्धन संस्कृती रुजवण्याची गरज आहे. जै.वा.स्थ. च्या स्थापनेमुळे समाजात ही मूल्ये रुजविणे शक्य होईल. तसेच नैसर्गिक संसाधनांचे शोषण बंद होऊन पर्यावरणाचा ऱ्हास थांबेल.

**२.७** जैव-विविधता वारसा स्थळांच्या स्थापनेमुळे समाजगटांच्या, त्यांनी स्वतः ठरविलेल्या सोडून इतर प्रचलित पारंपारिक पद्धतींवर व उपयोगांवर कसलेच निर्बंध येणार नाहीत. या संवर्धक उपाय-योजनांद्वारे स्थानिक समाजाच्या जीवनाचा स्तर सुधारावा हाच उद्देश आहे.

## ३.० संदर्भ आणि व्याख्या

**३.१** जैव-विविधता वारसा स्थळे (जै.वा.स्थ.) म्हणजे अनन्यसाधारण व परिस्थितिकीच्या दृष्टीने संवेदनशील असलेली विशेष स्थळे होय. समृद्ध जैव-विविधता लाभलेली ही भूस्थित, किनारी, भूमीअंतर्गत किंवा सामुद्री स्थळे होत. जै.वा.स्थ. ना पाळीव किंवा रानटी प्रजातींची किंवा आंतर्विशिष्ट, देशी प्रजाती, दुर्मिळ किंवा धोका उत्पन्न झालेल्या प्रजाती, पाळीव/लागवडीत जाती व त्यांच्या प्रकारांच्या रानटी नातेसंबंधांची/प्राचीन प्रजातींची समृद्ध अशी देण लाभलेली असते. या क्षेत्रांनी जीवाश्म स्तरही असतात व त्यांना वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक, नैतिक किंवा संदर्भात्मक मूल्ये असतात. ही स्थळे

त्यांच्याकडे दीर्घकालीन मानवी संबंध असो वा नसो, सांस्कृतिक विविधतेच्या संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाची असतात.

३.२ जै.वा.स्थ.चे संवर्धन व व्यवस्थापन योग्य प्रकारे व्हावे म्हणून रा.जै.प्रा.ने 'जै.वा.स्थ.चा शोध, अधिसूचना व व्यवस्थापनाकरिता मार्गदर्शक सूचना' विकसित करून जारी केल्या आहेत.

**४. जै.वा.स्थ. चा शोध व अधिसूचनेसाठीचे निकष**

४.१ जैविक विविधता अधिनियमाच्या अनुभाग ३७ मधील तरतुदींप्रमाणे जै.वा.स्थ. शोधून काढून अधिसूचित करता येतात. त्याकरिता खालीलपैकी कोणताही एक गुणधर्म असलेली क्षेत्रे जै.वा.स्थ. म्हणून शोधून काढून अधिसूचित करण्यास पात्र ठरू शकतात.



**नाल्लूर, कर्नाटक**

४.२ नैसर्गिक, अर्ध-नैसर्गिक व मानव-निर्मित अधिवासांचे परिदृश्य लाभलेली व जीवनाचे वैशिष्ट्यपूर्ण वैविध्य समाविष्ट असलेली क्षेत्रे.

४.३ पाळीव जैव-विविधतेचे वैशिष्ट्यपूर्ण घटक असलेली आणि/किंवा ह्या विविधतेचे पोषण करणाऱ्या प्रचलित कृषी व्यवस्थांसहित प्रातिनिधिक कृषी-पारिस्थितिकी व्यवस्था असलेली क्षेत्रे.

४.४ एकदम लहान क्षेत्रांसहित धोका उत्पन्न झालेली किंवा देशी वनस्पती/पशू जातींना आश्रय देणारी किंवा त्यांचा प्रवेशमार्ग ठरलेली क्षेत्रे. उदाहरणार्थ समाज संवर्धित क्षेत्रे किंवा नागरी हरित क्षेत्रे किंवा ओलेत्या जमिनी.

४.५ सरकारी, नागरी किंवा खाजगी असे सर्व प्रकारचे वैध भूमीवापर जे वरील गटांमध्ये समाविष्ट करता येतात.

४.६ सुधारित वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ खाली संरक्षित नेटवर्क म्हणून अंतर्भूत नसलेल्या अशा शक्य तेवढ्या क्षेत्रांचा विचार करता येईल.

४.७ पोषण व प्रजननासाठी पाण्यात किंवा भूमीवर ऋतूनुसार स्थलांतरित होणाऱ्या प्रजातींना अधिवासाची उपलब्धता करून देणारी क्षेत्रे.

४.८ वन खात्याच्या संशोधन विभागाने 'संवर्धन प्लॉट' म्हणून आरक्षित केलेली क्षेत्रे.

४.९ फाऊंडेशन फॉर रिव्हायटलायजेशन ऑफ लोकल हेल्थ ट्रेडिशन्स, बंगळुरू, ह्या संस्थेसह संयुक्तपणे स्थापन केलेली औषधी वनस्पती संवर्धन क्षेत्रे.

**५ जैव-विविधता वारसा स्थळांचा शोध व अधिसूचना**

जै.वा.स्थ. घोषित करण्याच्या दृष्टीने राज्य जैव-विविधता मंडळ, जै.व्य.स. व ग्रामसभा, पंचायती, नागरी वॉर्ड, वन संरक्षण समित्या, आदिवासी मंडळे इ. इतर संबद्ध नागरी संस्थांकडून सूचना मागवेल (किंवा आलेल्या सूचनांचा विचार करेल). रा.जै.मंडळांनी ग्रामीण

समाज, बि.स.सं., शेतकरी/मत्स्यमार/ आदिवासी संघटना, नागरी गट/समूह, संशोधन संस्था, सरकारी यंत्रणा तसेच इतर संस्था यांच्यामध्ये जै.वा. स्थ.च्या तरतूदींविषयी मोठ्या प्रमाणात माहिती-प्रसार करता येईल. त्यात स्थानिक भाषांतील वर्तमानपत्रे, रेडिओ, समाजगटांसमवेत बैठका, ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच इतर संबंधित संस्था यांचा समावेश करता येईल. ही प्रक्रिया खालील मार्गांद्वारे पूर्णतेस नेता येईल.

**५.१** बिगर सरकारी संघटना व नागरी संघटनाही (पंचायत राज संस्था, जैव-विविधता व्यवस्थापन समित्या किंवा समाजगटांनी पर्यावरण व विकासाच्या उद्देशाने स्वतः होऊन किंवा इतर पर्यावरणीय-योजनांतर्गत स्थापन केलेल्या नागरी संस्था धरून) जै.वा. स्थ.ची घोषणा करण्याकरिता प्रस्ताव पाठविता येतील.

**५.२** जैव-विविधता वारसा स्थळे म्हणून नियुक्त करण्यास लायक अशा क्षेत्रांची यादी तयार करण्याच्या दृष्टीने प्राप्त सूचनांचे एकत्रीकरण. हे एकत्रीकरण चालू असतानाही एखाद्या जै.वा. स्थ.साठी आलेल्या सूचना व अर्जांचा त्या-त्या वेळीच विचार.

**५.३** संसाधनांच्या वापरावर येणाऱ्या संभाव्य निर्बंधांसहित, त्यांच्या क्षेत्रांत जै.वा.स्थ. घोषित करण्यासाठी तयार करण्याच्या ठोस/निश्चित प्रस्तावांसंबंधी स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामसभा, नागरी वॉर्ड व इतर संबद्ध स्थानिक संस्था यांच्यामध्ये जाहीर चर्चा. त्या चर्चेत समाजातील विविध लैंगिक व सामाजिक गटांना प्रतिनिधित्व मिळावे म्हणून सर्वतोपरी प्रयत्न.

**५.४** एकदा संबंधित ग्रामसभा किंवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने मान्यता दिल्यानंतर, रा.जै.मं.ने एक प्राथमिक अधिसूचना जारी करावी लागेल. तिच्यात जै.वा.स्थ.च्या सीमारेषा (ज्यासाठी सर्वेक्षण व नकाशे रेखाटनाची गरज भासेल) तसेच जै.वा. स्थ.च्या व्यवस्थापनासाठीचे निर्बंध (असल्यास) यांचा समावेश असला पाहिजे. ही अधिसूचना स्थानिक प्रसारमाध्यमांत प्रकाशित करून, विशेषतः समाज व व्यक्ती-मालकीच्या स्थळांच्या बाबतीत, इच्छूक व्यक्ती/ लाभ-दावेदार यांच्याकडून सूचना व हरकती मागविल्या पाहिजेत.

**५.५** प्राप्त सूचना व हरकतींवर आधारून जै.व्य.स./इतर संबद्ध स्थानिक संस्था/ रा.जै.मं. यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे चर्चा करून जै.वा.स्थ. संबंधात चित्र स्पष्ट होण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी एका गटाची स्थापना करावी लागेल. या गटात खालील व्यक्तींचा समावेश करता येईल. (कमाल १२ सदस्य), आणि या गटाचा प्रमुख शक्यतो स्थानिक समाजगटांमधून (एक किंवा अधिक) निवडलेली व्यक्ती असेल.

**५.५.१** संबद्ध ग्रामीण/नागरी समाज संस्थेत नियुक्त केलेली तज्ज्ञ किंवा अनुभवी अशी सर्व सामाजिक, आर्थिक गटांचे प्रतिनिधित्व करणारी पुरुष/स्त्री व्यक्ती.

**५.५.२** पारिस्थितिकीय शास्त्र/संवर्धन यांवर भर देणारी एक किंवा अधिक बि.स.सं./संस्था (विशिष्ट जै.वा.स्थ मधील वनस्पती व पशूंकडे सुपरिचित असलेले संवर्धन जीवशास्त्रज्ञ धरून)

**५.५.३** सामाजिक क्षेत्रात (लिंगभेद, उपजिविका इ.) कार्य करणारी/ऱ्या बि.स.सं./संस्था.

**५.५.४** कृषी क्षेत्रास प्राधान्य देऊन काम करणारी/ऱ्या बि.स.सं./संस्था.

**५.५.५** कृषी, वन किंवा इतर संबद्ध खात्यांचा (जिथे योग्य व जिथे शक्य तिथे) संशोधन विभाग.

**५.५.६** निवासी महाविद्यालय/विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र किंवा प्राणीशास्त्र विभागाचा प्रतिनिधी.

**५.६** व्यवसाय, लिंग किंवा सामाजिक स्तर यांच्या निरपेक्ष, वरील गट संबंधित समाजगटांकडे चर्चा करून (३ ते ६ महिन्यांच्या कालावधीत) अभ्यास पूर्ण करेल. या चर्चेमध्ये न चुकता वनवासी, शेतकरी, किनारी व पठारी समाजगट (एक किंवा अधिक) आणि/किंवा इतर संबद्ध व्यावसायिक गटांना समाविष्ट करून घेतले पाहिजे. समाज-आधारित लो.जै.र. / पी. आर. ए., सहभागात्मक नकाशे व संबंधित समाजाने योग्य मानलेली इतर शक्य ती सर्व उपकरणे वापरून खालील गोष्टींचा अभ्यास करणे आवश्यक आहे. संबद्ध माहिती, नकाशे व इतर दस्तावेज देऊन राज्य सरकारने या उपक्रमाची उत्पादनशीलता वाढविण्याच्या दृष्टीने त्यांच्या सहभागाची खात्री केली पाहिजे. या अभ्यासात खालील बाबींचा समावेश होऊ शकेल.



**अंबरगुड्डा, कर्नाटक**

**५.६.१** सामायिक संपत्ती संसाधने (सा.सं.सं.), प्रशासकीय नियंत्रण तसेच भूमी व संसाधन वापर यांच्यासहित भूमी/ जलाशय मालकी/हक्क यांचा इतिहास.

**५.६.२** भूमी मालकीची सद्यस्थिती, सा.सं.सं. च्या कार्यकाळाची तसेच प्रवेश/हक्कांची सद्यस्थिती, भूमी/वन यांच्या संबंधातील वादग्रस्त खटले (असल्यास), भूमी व संसाधन वापराची पद्धत (जैव-विविधता आधारित उपजिविका धरून), कायदेशीर व प्रशासकीय नियंत्रण, हक्क व जबाबदाऱ्या.

**५.६.३** समाज-घटकांचे प्रमाण, गुणधर्म, सामाजिक, आर्थिक व लिंगानुसार संसाधनांवर अवलंबत्वाचे प्रमाण, सामाजिक-आर्थिक व लोकसंख्याविषयक माहिती.

**५.६.४** सध्या अस्तित्वात असलेल्या संस्था, नैसर्गिक संसाधनांचे नियंत्रण करणारे गट तसेच महिलांसहित वंचित गटांकरिता निर्णय-प्रक्रियेत प्रवेशासाठीचे नियम व नियमने.

**५.६.५** क्षेत्राचा पारिस्थितिकीय माहितीपट, वन्यजीव व कृषी जैव-विविधतेची निर्णायक मूल्ये तसेच जैविक विविधतेला निर्माण झालेले धोके व त्यांचे शोषण (असल्यास).

**५.६.६** क्षेत्राचा वन्यजीवांनी प्रवेशमार्ग किंवा आश्रयस्थान म्हणून किंवा इतर कोणताही अन्य प्रकारे केलेला उपयोग.

**५.६.७** (कृषीसहित) जैव-विविधतेवर (चांगले किंवा वाईट) परिणाम घडविणाऱ्या समाजाच्या कृती.

**५.६.८** त्या क्षेत्रात (संसाधनांचा वापर, समाजाधिष्ठित पर्यावरणीय पर्यटन इ. माध्यमांद्वारे) उपजिविका निर्मितीसाठीची शक्यता.

**५.६.९** निर्बंधाचे (असल्यास) लोकांवर व जैव-विविधतेवर होणारे प्रभाव.

**५.७** वरील गटाने आपला अभ्यास अहवाल जै.व्य.स.ला किंवा ती स्थापन झाली नसल्यास संबंधित इतर स्थानिक स्वराज्य संस्थेला सादर करावा लागेल. ती संस्था तो अहवाल रा.जै.मंडळाला सादर करण्यापूर्वी गटाने काढलेले निष्कर्ष (स्थानिक भाषेत) जै.वा.स्थ. घोषित करण्याच्या प्रस्तावासहित संबंधित समाजगटापर्यंत व लाभ दावेदारांपर्यंत पोहोचवेल.

**५.८** सर्वेक्षण गटाने किंवा जै.व्य.स.ने किंवा ती स्थापन झाली नसल्यास संबद्ध इतर संस्थेने सादर केलेल्या अहवालाचा, संबंधित समाजगटाला देणाच्या प्रक्रियेसह आढावा, रा.जै.मंडळ तीन महिन्यांच्या आत घेईल.

**५.९** प्रस्तावित स्थळावर सर्व लाभ-दावेदारांच्या संयुक्त बैठकीमध्ये रा.जै.मंडळ प्रस्तावावर अंतिम निर्णय घेईल.

**५.१०** जै.वा.स्थ. जाहीर करण्यासाठीच्या अधिसूचनेचा मसुदा व घोषणा, राज्य स्तरावर यथायोग्य पद्धतीने, प्रसार-माध्यमांतून, विशेषतः स्थानिक भाषेत व्यापक प्रसिद्धी करून करता येईल.

**५.११** जै.वा.स्थ.च्या अधिसूचनेचा मसुदा जाहीर झाल्याच्या ३० दिवसांनंतर, जै.व्य.स.ने किंवा ती स्थापन झाली नसल्यास तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेकडे संलग्न इतर संबद्ध स्थानिक संस्थांनी, स्थानिक स्वराज्य संस्थेस बरोबर घेऊन एक जाहीर लोकसुनावणी आयोजित करून, जै.वा.स्थ.चे सर्व तपशील सभेसमोर ठेवून तसेच लोकांकडून आलेल्या सूचनांची नोंद करून घेऊन, संबंधित क्षेत्र जै.वा.स्थ. म्हणून घोषित केल्याने होणाऱ्या परिणामांविषयी लोकांच्या शंका/ पूर्वग्रह असल्यास त्या दूर करण्याचा

प्रयत्न केला पाहिजे. एखादे क्षेत्र जै.वा.स्थ. म्हणून घोषित केल्यास त्यांच्या पारंपारिक हक्कांवर व अधिकारांवर बाधा येणार नाही याची खात्री त्यांना करून देऊन, स्थानिक समाजाला विश्वासात घेतले पाहिजे.

**५.१२** जै.वा.स्थ. ची घोषणा केल्यानंतर, रा.जै.मं. संबंधित सरकारी/इतर खात्यांना जै.वा.स्थ. स्थापनेसंबंधी/अधिसूचनेसंबंधी सूचित केले पाहिजे.

**५.१३**. सर्व परिस्थितीत वरील प्रक्रिया घडणे संयुक्तिक असले तरी जोखीम टाळण्याच्या दृष्टीने किंवा इतर कारणांमुळे जै.वा.स्थ.ची घोषणा तातडीने करणे फारच आवश्यक झाल्यामुळे, अनेकदा त्या प्रक्रियेचे पालन करणे समाजाला शक्य होणार नाही. काही वेळा संवर्धनाच्या कार्यास यापूर्वीच वाहून घेतलेल्या समाजाकडून, आपले स्थान निश्चित करण्याच्या दृष्टीने त्या स्थळाला जै.वा.स्थ.चा दर्जा ताबडतोब देणे गरजेचे दिसल्याने तशा आशयाचा प्रस्ताव येतो. तशा स्थितीत, अधिसूचना जारी करण्यासाठी सखोल अभ्यास करण्याची अट शिथील करता येईल, परंतु अधिसूचना जारी झाल्यानंतर लगेच त्या अटींचे पालन झाले पाहिजे व समाजाने पूर्वीपासून आपल्यावर घालून घेतलेल्या निर्बंधां व्यतिरिक्त, प्रदेशाच्या दृष्टीने इतर कोणतेच विस्थापन किंवा निर्बंध लागू केले जाऊ नयेत.



## ६ जै.वा.स्थ.चे व्यवस्थापन

**६.१** जै.वा.स्थ. अधिसूचित केल्यानंतर, जैव-विविधता व्यवस्थापन समिती किंवा ती नसल्यास संबद्ध स्थानिक स्वराज्य संस्थेने अधिनियुक्त केलेल्या इतर कोणत्याही योग्य संस्थेने आपल्या नियमित कार्याव्यतिरिक्त प्रत्येक जै.वा.स्थ.चे व्यवस्थापनही केले पाहिजे. जिथे जै.वा.स्थ.चा विस्तार एकापेक्षा अधिक स्थानिक संस्थांपर्यंत असेल, तिथे जै.वा.स्थ.च्या व्यवस्थापनाची जबाबदारी जै.व्य.स.ने नियुक्त केलेल्या जैव-विविधता वारसा स्थळ व्यवस्थापन समितीची किंवा जै.व्य.स. नसल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेकडे संलग्न असलेल्या व रा.जै.मं.ने मान्यता दिलेल्या इतर संबद्ध स्थानिक संस्थेची असेल.

**६.२** जै.वा.स्थ.च्या व्यवस्थापनाकरिता जबाबदार असलेल्या समितीमध्ये सामान्यपणे सर्व स्थानिक समाजगटांचे प्रतिनिधी तसेच विशेषतः नैसर्गिक संसाधनांवर सर्वांत अधिक प्रमाणात अवलंबून असलेल्या तसेच त्या क्षेत्राच्या पारंपारिक संवर्धनात गुंतलेल्या व्यक्तींचा समावेश असला पाहिजे.

६.३ पाच ते दहा वर्षांच्या काळादरम्यान चालणारी एक व्यवस्थापन योजना तयार करण्याची व राबविण्याची जबाबदारी जै.व्य.स. / जै.वा.स्थ. व्यवस्थापन समितीची असेल.

६.४ त्यानंतर रा.जै.मं. अंतिम व्यवस्थापन योजनेला मान्यता देऊन तिची अंमलबजावणी सुरू करण्यास मदत करेल. या मदतीमध्ये संबंधित खात्यांसाठी तसेच बि.स.सं. साठी आवश्यक उद्‌बोधन कार्यक्रम आयोजित करून, जैव-विविधतेचे संवर्धन करण्यास समाजाला पूर्णपणे सबल व सशक्त करणे, जैव-विविधतेस बाधा आणणाऱ्या कृती नष्ट करण्याच्या दृष्टीने आपल्या योजना व उपक्रमांमध्ये आवश्यक ते बदल घडवून आणून अंमलबजावणीत समाजाला मदत करण्याच्या दृष्टीने संबद्ध सरकारी खात्यांना आदेश देणे इत्यादींचा समावेश होतो.

६.५ बाह्य-अधिवासांमधून संकलित करून धोका निर्माण झालेल्या/ स्थानिक क्षेत्रातून नामशेष झालेल्या वन्य जीवजातींचे शक्य तेथे पुर्नस्थापन करण्याच्या तसेच लुप्त/ घट झालेल्या पाळीव जैव-विविधतेच्या पुनरागमानसहीत ऱ्हास झालेल्या किंवा हरवलेल्या परिस्थितिकीय व्यवस्था व वनस्पतींचे पुर्ननिर्माण व पुनर्नुतनीकरणाचे सुलभीकरण रा.जै.मं. आणि संबंधित सरकारी खातीं करतील.

६.६ संवर्धनाकडे संबंधित प्रचलित व्यवस्थापन पद्धती, ज्या जै.वा.स्थ.च्या उद्दिष्टांची पूर्ती करतात, त्यांचे दस्तावेजीकरण करून त्यांचा विचार जै.वा.स्थ. व्यवस्थापन योजनेत करता येईल.

६.७ जै.वा.स्थ.वर विपरित परिणाम होई शकेल असा सरकार किंवा अन्य कोणत्याही यंत्रणेने राबविण्याचा कोणताही प्रकल्प/ उपक्रम टाळला पाहिजे.

६.८ प्रस्तावित जै.वा.स्थ. मधील संसाधनांच्या प्रचलित विनियोगाच्या संबंधी समाजावर सर्वसाधारणपणे कोणतेही निर्बंध लागू होण्याची शक्यता नाही.

६.९ संसाधनांच्या वापराचे नियमन करण्याच्या रुपातील निर्बंधांचा आदेश काही बाबतीत काढता येईल, परंतु तसे निर्बंध मानणे समाजावर सक्तीचे असणार नाही.

६.१० सरकारी वनक्षेत्रे व सरकारी मालकीच्या इतर क्षेत्रांनी अधिसूचित केलेल्या जै.वा.स्थ.ची व्यवस्थापन रचना व संसाधनांचा विनियोग यांची निश्चिती राज्य सरकारचे संबंधित खाते करेल.

## ७ जै.वा.स्थ. व्यवस्थापन योजनेचे घटक

७.१ अधिसूचित केल्याप्रमाणे प्रशासकीय सीमारेषांसहित जै.वा.स्थ.चा नकाशा.

७.२ मालकीची सद्यस्थिती.

७.३ जमीन वापराची सद्यस्थिती, संवर्धनाकडे संबंधित पद्धती व समजुती तसेच स्थानिक समाजाचे अवलंबित्व.

७.४ क्षेत्रातील प्रमुख जैव-विविधता व त्यांची स्थिती, उदा. देशी, धोका उत्पन्न झालेल्या, नामशेष/निर्वंश किंवा अप्रतिकारक्षम जाती.

७.५ हिवाळ्यातील निर्वासित क्षेत्र किंवा पक्षांचे पिल्लांना जन्म देण्याचे/अंडी घालण्याचे क्षेत्र किंवा वन्य पशूंचे प्रवेशद्वार.

**७.६** स्थानिक लोकांनी वापरलेल्या संसाधनांचे प्रकार व प्रमाण तसेच देशी/स्थानिक अर्थ-व्यवस्थेतील त्यांची भूमिका/महत्त्व व त्याशिवाय जिथे त्यांची विक्री होते तेथे त्यांच्यापासून मिळणारे सरासरी उत्पन्न.

**७.७** गत दहा वर्षांदरम्यान वापराच्या पद्धतीत झालेला कोणताही बदल/परिवर्तन. तसे असल्यास त्यांची कारणे.

**७.८** क्षेत्रातील वनस्पती, पशू व नैसर्गिक संसाधनांची वास्तविक माहिती.

७.९ सरकारी/आंतरराष्ट्रीय योजनांतर्गत क्षेत्रातील प्रकल्पांचे तपशील (असल्यास).

**७.१०** जैव - विविधतेच्या अधिक चांगल्या संवर्धनासाठी तसेच नैसर्गिक संसाधने वापरून जीवनमान उंचावण्यासाठीच्या स्थानिक समाजाच्या कोणत्याही सूचना (असल्यास).

**७.११** जै.वा.स्थ. ना सध्या असलेले व भविष्यकालीन संभाव्य धोके.

**७.१२** स्थानिक लोकांचे जीवनमान सुधारावे या दृष्टीने जैव-संसाधनांचे संवर्धन व चिरकालीन वापर यांच्यासाठीचे स्वतंत्र व्यवस्थापन उपक्रम.

**७.१३** पारिस्थितिकीय व सामाजिक/आर्थिक (जिथे संबद्ध अनुमानित उत्पन्न अपेक्षित असते तिथे) उत्पन्नासहित जै.वा.स्थ. स्थापन केल्याच्या अपेक्षित निष्पन्नाचे अंदाजे चित्रण.

**७.१४** योजनेतील प्रत्येक घटकांच्या पूर्ततेसाठीची अंदाजे कालमर्यादा व प्रत्येक घटकांचे यश मोजण्याच्या दृष्टीने अंदाजे निर्देशक.

**७.१५** व्यवस्थापन योजनेची वरील प्रक्रिया, समाज ज्या विविध प्रकारांनी नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन व व्यवस्थापन करतो, त्यात अडथळे निर्माण करणाऱ्या असू नयेत, समाजाकडे चिरकालीन पर्याप्त व्यवस्था असल्यास व तिच्याद्वारे संवर्धन व चिरकालीन व्यवस्थापन होत असल्यास नव्याने व्यवस्थापन योजना तयार करण्याचीही आवश्यकता नसेल. अनेकवेळा, तशा प्रकारची व्यवस्थापन योजना तातडीने तयार करणे समाजाला शक्य होणार नाही. परंतु ते त्या स्थळाला जै.वा.स्थ. म्हणून घोषीत न करण्याचे कारण बनू शकणार नाही.

**७.१६** व्यवस्थापन योजना प्राप्त झाल्यानंतर, तिच्या मूल्यांकनाकरिता रा.जै.मं. एक तज्ज्ञ समिती नियुक्त करेल, आवश्यक वाटल्यास जै.वा.स्थ.ना भेटी देईल, तसेच स्थानिक लोक व स्थानिक संस्थांकडे चर्चा करून व्यवस्थापन योजनेस त्यांची मान्यता मिळवेल. संबद्ध सरकारी यंत्रणांनी केलेला निधी पुरवठा व सुलभिकरण यांच्या सर्वोत्तम लाभांच्या दृष्टीने व्यवस्थापन योजनेचे जिल्हा पातळीवरील नियोजन प्रक्रियेत एकात्मिकरणही करता येईल.

**७.१७** मान्यताप्राप्त योजना प्राप्त झाल्यानंतर, रा.जै.मं. नी त्यांचा स्वीकार करता येईल.

७.१८ जै.व्य.स. ने किंवा जै.व्य.स. नसल्यास स्थानिक संस्थेकडे संलग्न इतर संबद्ध स्थानिक संस्थांनी केलेल्या शिफारशींवर आधारून रा.जै.मं.ने नेमलेल्या तज्ज्ञ समितीने ठराविक काळानंतर व्यवस्थापन योजनेचे अवलोकन केले पाहिजे व ती यथायोग्य पद्धतीने बदलली पाहिजे. तशी सुधारित योजना रा.जै.मं. ने स्वीकारून, तिची अंमलबजावणी करण्यापूर्वी, सर्व लाभधारकांना ते बदल कळवले पाहिजेत.

## ८. जै.वा.स्थ.ची देखरेख.

८.१ रा.जै.मं.ने स्थापन केलेली एक राज्य स्तरीय देखरेख समिती असावी.

८.२ वन्यजीव व पाळीव जैव-विविधता, तसेच संबंधित सामाजिक-आर्थिक बाबी या क्षेत्रांत तज्ज्ञ असलेल्या व्यक्तींच्या, खाली दिलेल्या गटांमधून राज्यस्तरीय व्यवस्थापन समितीचे सदस्य निवडता येतील.

८.२.१ रा.जै.मं.चा अध्यक्ष

८.२.२ रा.जै.मं.चा सदस्य सचिव

८.२.३ स्थानिक समाज गटांचा एक प्रतिनिधी.

८.२.४ वन/वन्यजीवन/कृषी-जैव-विवधता/ जलकृषी व्यवस्थापन किंवा विशिष्ट जै.व्य.स. कडे संबद्ध क्षेत्राचे ज्ञान व अनुभव असलेली एक तज्ज्ञ व्यक्ती.

८.२.५ संबंधित जै.व्य.स. / जै.वा.स्थ. व्यवस्थापन समितीचा व जै.व्य.स. नसल्यास स्थानिक संस्थेकडे संलग्न इतर संबद्ध स्थानिक संस्थेचा सदस्य.

८.२.६ संबंधित स्थानिक संस्था/पंचायत यांनी नियुक्त केलेला एक सदस्य.

८.२.७ महसूल विभागाचा एक प्रतिनिधी.

८.३ व्यवस्थापन योजनेच्या अंमलबजावणीची देखरेख निर्धारित काळानंतर राज्यस्तरीय देखरेख समिती करेल व रा.जै.मं.ला, व्यवस्थापन योजनेच्या प्रत्येक घटकाच्या यशाचे (गुणात्मक तसेच संख्यात्मक) प्रमाण स्पष्टपणे नमूद करून तसेच सुधारणेसाठीच्या शिफारशी देऊन अहवाल सादर करेल.

८.४ देखरेख समितीचा कार्यकाळ तीन वर्षांचा असेल.



**कियोंती, मध्यप्रदेश**

## ९ जैव-विविधता वारसा स्थळांच्या व्यवस्थापनात रा.जै.प्रा. व रा.जै.मं. यांची भूमिका

९.१ जै.व्य.स.चे महत्त्व व स्थिती यांची खात्री करण्याच्या दृष्टीने लोकप्रिय माध्यमे, कार्यशाळा, माहिती-पुस्तिका इ.द्वारे रा.जै.मं. त्यांच्या पर्याप्त व परिणामकारक सार्वजनिक प्रचाराची खात्री करेल. वरील उपक्रम हाती घेण्याच्या दृष्टीने रा.जै.मं. ला आवश्यक निधी-पुरवण रा.जै.प्रा. करेल.

९.२ बि.स.सं., जै.व्य.स./इतर संस्था, रा.जै.मं. समविचारी खात्यांचे अधिकारी, ॲकॅडेमिक संस्था, तज्ज्ञ इ.च्या सहभागासहित सर्व जै.वा.स्थ.ची राष्ट्रीय स्तरावरील वार्षिक बैठक रा.जै. प्रा. आयोजित करेल व त्या बैठकीचे इतिवृत्त पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांना सादर करेल.

९.३ रा.जै.प्रा. द्वारे भारत सरकाराकडे चर्चा केल्यानंतर राज्य सरकारला मार्गदर्शक सूचना अधिसूचित करता येतील.

## १० अर्थसंकल्पीय तरतूद

१०.१ राज्य सरकारने जै.वा.स्थ. अधिसूचित केल्यानंतर, रा.जै.प्रा.ने रा.जै.मं.द्वारे जै.वा.स्थ.च्या प्रारंभीक स्थापनेस सहाय्य करण्याच्या दृष्टीने, बीजरक्कम म्हणून पर्याप्त रक्कम पुरवता येईल. त्याचबरोबर स्थानिक संस्थे/स्थांच्या वार्षिक अर्थसंकल्पात जै.वा.स्थ.च्या आर्थिक गरजांचा अंतर्भाव करता येईल. राज्य सरकारनेही रा.जै.मं. द्वारे अधिसूचना आल्यानंतर प्रत्येक जै.वा. स्थ.ला बीज-रक्कम म्हणून आवश्यक रक्कम देता येईल. सर्व सरकारी योजनांखाली किंवा इतर निधी पुरवण करणाऱ्या स्त्रोतांकडून आर्थिक सहाय्य घेणाऱ्या कायदेशीर प्राधिकृत संस्था म्हणून जै.व्य.स. किंवा जै.वा.स्थ.चे व्यवस्थापन करणाऱ्या इतर संस्थेस मान्यता देण्यात येईल.

जै.व्य.स. किंवा कोणत्याही इतर संस्थेच्या राष्ट्रीयकृत बँक किंवा पोस्ट ऑफिसमधील सध्याचे/नवीन व्याज जमा होणाऱ्या बचत खात्याला तशा प्रकारची सर्व रक्कम प्राप्त करण्याचा अधिकार असेल. उपरोल्लेखित जै.वा. स्थ.चे व्यवस्थापन करणाऱ्या संस्थांच्या हिशोबाचे स्थानिक संस्था करतात त्याप्रमाणे नियमांनुसार वार्षिक लेखा-परिक्षण करण्यात येईल.

१०.२ आपापल्या राज्यात जै.वा.स्थ.ची निर्मिती/घोषणा करण्याच्या अधिसूचनेविषयी रा.जै.मंडळ रा.जै.प्रा.ला वेळोवेळी कळवेल. जै.व्य.स./इतर संस्था/रा.जै.मं. यांनी जै.वा.स्थ. च्या केलेल्या व्यवस्थापन कामगिरीचे लेखा-परिक्षण रा.जै.प्रा. तिच्या तज्ज्ञ समितीद्वारे करेल.

## ११. समारोप

विविध राज्य सरकारांनी, जैव-विविधता अधिनियमाखाली तयार करण्याच्या नियमांना सहाय्य व्हावे म्हणून अनेक तज्ज्ञ व्यक्तींकडे चर्चा करून काही आवश्यक बदलांसहित या आदर्श मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. परंतु त्या जै.वि. अधिनियम, २००२ ची चौकट व तिच्या उद्दिष्टांशी एकनिष्ठ आहेत.



**होग्रेखान, कर्नाटक**